## नियमीत दिवाणी मुकदमा क्र.४३८/२०१८ मधील
## निशाणी क्र.४३ वर आदेश

**CNR-MHLA110015042018**

०१. सदरचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ खालील तरतुदीनुसार दाखल केला आहे. अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, अर्जात नमुद मिळकती ह्या वादी व प्रतिवादी क्र.१ ते ३ च्या वडिलोपार्जित व एकत्र कुटूंबाच्या मिळकती असुन सदर मिळकतींची अद्याप सरस निरस मानाने वाटणी झालेली नाही. परंतु, प्रतिवादी क्र.१ ने मिळकतींच्या उताऱ्यावर असलेल्या नोंदीच्या आधारे अर्जात नमुद मिळकतींबाबत बोगस व बनावट खरेदीखत प्रतिवादी क्र.४ ते १६ च्या हक्कात अस्तित्वात आणलेले आहेत. सदर खरेदीखत वादीवर बंधनकारक नाहीत. सदर बोगस व बनावट खरेदीखतांच्या आधारे प्रतिवादी क्र.४ ते १६ यांनी मिळकती हस्तांतरीत केल्यास वादीचे अपरिमीत नुकसान होऊन प्रकरणाची संख्या वाढणार आहे. सदर वादीने प्रतिवादींकडे मिळकतींची वाटणी करुन मागितली असता त्यास प्रतिवादींनी नकार दिला. त्यामुळे वादीला सदरचा दावा व अर्ज दाखल करणे भाग पडलेले आहे. त्यामुळे सदर दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत प्रतिवादी क्र.४ ते १६ यांनी अर्जात नमुद मिळकतींचे हस्तांतरण करु नये, असा तात्पुरता मनाई आदेश पारीत करण्याची वादीने शेवटी मागणी केलेली आहे.

०२. सदर प्रकरणातील प्रतिवादी क्र.४, ६ व ९ यांनी नि.क्र.५६ ला

कैफियत दाखल करुन दाव्यातील संपूर्ण मागणी नाकारलेली आहे. तसेच सदर प्रतिवादींनी नि.क्र.५८ ला पुरसीस दाखल करुन कैफियतीमधील कथन म्हणणे म्हणुन स्वीकारलेले आहे. सदर म्हणण्यामधील थोडक्यात कथन असे आहे की, अर्जातील मागणी योग्य व कायदेशीर नाही. अर्जात नमुद मिळकतींशी वादीचा काही संबंध नाही. केवळ सदर प्रतिवादींना त्रास देण्यासाठी खोटा दावा व अर्ज वादीने दाखल केलेला आहे. सदर प्रतिवादी हे मिळकतींचे मालक व कब्जेदार आहेत. प्रतिवादी क्र.१ ने कौटुंबीक गरजेसाठी मिळकतींबाबत व्यवहार केलेले आहेत. तसेच खरेदीखतानुसार मिळकतींच्या उताऱ्यावर प्रतिवादींची नावं दाखल झालेली आहेत. त्याबाबत वादीने हरकत घेतलेली नाही. त्यामुळे दावा व अर्ज चालु शकत नाही. त्यामुळे अर्ज नामंजुर करण्याची सदर प्रतिवादींनी शेवटी मागणी केलेली आहे. प्रकरणातील प्रतिवादी क्र.५, ७, ८, १० ते १६ यांनी नोटीस मिळुन देखील म्हणणे दाखल केलेले नाही. त्यामुळे सदर अर्ज प्रतिवादी क्र. ५, ७, ८, १० ते १६ विरुद्ध एकतर्फा व विनाम्हणणे पुढे चालविण्यात आलेला आहे.

०३. सदर अर्जातील व म्हणण्यामधील कथन विचारात घेवून सदरचा अर्ज निकाली काढण्याकरीता खालील मुद्दे विचारात घेण्यात आलेले आहेत. सदर मुद्दयांना कारणांसहीत निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १. | अर्जातील मागणीबाबत प्रथमदर्शनी केस वादीच्या लाभात असल्याचे वादी सिध्द करतो का? | .. | होकारार्थी |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | अर्जातील मागणीबाबत न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने असल्याचे वादी सिध्द करतो का? | .. | होकारार्थी |
| ३. | अर्जातील मागणीबाबत अपरिमित हानीचा मुद्दा वादीच्या बाजूने असल्याचे वादी सिध्द करतो का? | .. | होकारार्थी |
| ४. | आदेश काय? | .. | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ ते ३ करिताः–**

०४. सदर प्रकरणात दाखल केलेल्या कागदपत्रावरुन व दोन्ही बाजुंच्या विद्वान वकिलांच्या युक्तिवादावरुन सर्वप्रथम याठिकाणी नमूद करणे आवश्यक वाटते की, सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ खालील तरतुदींनुसार दाखल केलेला असल्यामुळे सदर प्रकरणातील वादीने अर्जातील मागणीबाबत प्रथमदर्शनी केस, न्यायाचा समतोल व अपरिमीत हानीचा मुद्दा वादीच्या बाजूने असल्याचे सिध्द करणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर प्रकरणातील वादीने सदर बाबी सिध्द केलेल्या आहेत का? हे पाहणे आवश्यक आहे. तसेच सदर प्रकरणातील वादी हा स्वच्छ हाताने म्हणजेच सर्व बाबी स्पष्टपणे कथन करुन सदरचा अर्ज दाखल केलेला आहे का? हे देखील विचारात घेणे जरुरीचे आहे.

०५. सदर वादीने अर्जामध्ये दाव्याचा अंतिम निकाल होईपर्यंत प्रतिवादी क्र.४ ते १६ यांनी अर्जात नमूद मिळकतींचे हस्तांतरण करु नये असा तात्पुरता

मनाई आदेश पारीत करण्याची मागणी केलेली आहे. सदर प्रकरणातील प्रतिवादी क्र.४, ६ व ९ यांनी म्हणणे दाखल करुन अर्जातील मागणी स्पष्टपणे नाकारलेली आहे. सदर अर्जातील व म्हणण्यामधील कथन विचारात घेऊन याठिकाणी नमुद करणे आवश्यक वाटते की, अर्जात नमुद मिळकतींशी वादीचा संबंध आहे किंवा नाही व अर्जात नमुद मिळकतींची सरस निरस मानाने वाटणी झालेली आहे किंवा कसे ह्या बाबी पक्षकारांनी पुरावा दाखल केल्यानंतर स्पष्ट होणार आहेत. तसेच वादीला दावा दाखल करण्याचा व वाटणी मागण्याचा अधिकार आहे किंवा नाही हे देखील पक्षकारांनी पुरावा दाखल केल्यानंतर स्पष्ट होणार आहे. तसेच दाव्यात नमुद केल्याप्रमाणे कथीत खरेदीखत बोगस व बनावट आहेत किंवा कसे ही बाब देखील पक्षकारांनी पुरावा दाखल केल्यानंतर स्पष्ट होणार आहे.

०६. वादीने नि.क्र.४ सोबत दाखल केलेल्या कागदपत्रावरुन अर्जात नमुद मिळकतींच्या उताऱ्यावर प्रतिवादींची नावं असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. सदर दावा प्रलंबित असताना मिळकतींच्या उताऱ्यावरील नोंदीच्या आधारे व कथीत खरेदीखताच्या आधारे प्रतिवादींनी अर्जात नमुद मिळकतींचे हस्तांतरण केल्यास प्रकरणामध्ये गुंतागूंत वाढण्याची व प्रकरणाची संख्या वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसे झाल्यास वादीचे अपरिमित नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याउलट सदर दाव्याचे अंतिम निकाल होईपर्यंत प्रतिवादी क्र.४ ते १६ यांनी अर्जात नमुद मिळकतींचे हस्तांतरण करु नये, असा तात्पुरता मनाई हुकूम पारीत केल्यास प्रतिवादी क्र.४ ते १६ यांचे कोणतेही नुकसान होणार नाही.

त्यामुळे प्रकरणात दाखल कागदपत्रावरुन व वर नमूद चर्चेवरुन माझे असे मत झाले आहे की, दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ खालील तरतुदीनुसार अर्जात मागणी केल्याप्रमाणे तात्पुरता मनाई आदेश पारीत करण्यासाठी लागणारे महत्त्वाचे घटक प्रथमदर्शनी केस, न्यायाचा समतोल व अपरिमित हानीचा मुद्दा वादीच्या बाजूने असल्याचे वादीने सिध्द केलेले आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ ते ३ ला होकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.४ करिताः–</u>**

०७. वर नमूद चर्चेवरुन व मुद्दा क्र.१ ते ३ ला नोंदविलेल्या निष्कर्षावरुन स्पष्ट होते की, वादीने अर्जातील मागणी सिध्द केलेली आहे. त्यामुळे अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

| | |
|---|---|
| १. | निशाणी क्र.४३ वरील अर्ज खालीलप्रमाणे मंजूर करण्यात येत आहे. |
| २. | सदर दाव्याचा अंतिम निकाल होईपर्यंत प्रतिवादी क्र.४ ते १६ यांनी स्वतः अगर ईतरांमार्फत अर्जात नमुद मिळकतींचे हस्तांतरण करु नये असा तात्पुरता मनाई हुकूम पारीत करण्यात येत आहे. |

स्वा/–
(शिवकांत म. गौरगोंड)
सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, निलंगा.

निलंगा.
दि.१४/०८/२०१९.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | M.N. Yenge |
| Name of the Court | : | Jt. C.J.S.D Court (Shivkant M. Gourgond) |
| Date of Judgment/Order | : | 14.08.2019 |
| Judgment/Order signed by presiding officer | : | 14.08.2019 |
| Judgment/Order uploaded on | : | 16.08.2019 |